महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
सर्व्हे क्र. ८३२ए, फायनल प्लॉट क्र. १७८ व १७९, बी.एम.सी.सी.रोड, बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे -४११००४.

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pune.
Survey No.832 A,Final Plot No.178 & 179
B.M.C.C.Road, Near Balchitravani, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

Tel.No. 020- 25705000
Email – secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./पापुअ/३३८८
पुणे -४११००४
दिनांक:- ११/०६/२०२१

प्रति,

विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, सर्व विभागीय मंडळे.

**विषयः- उच्च माध्यमिक स्तरावरील 'पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा' या श्रेणी विषयाच्या मूल्यमापनासाठी अंतर्गत व बाह्य परीक्षक नेमणुकीबाबत.**

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार उच्च माध्यमिक स्तरावरील मूल्यमापन आराखडयात इयत्ता ११ वी व १२ वी 'पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा' या विषयासाठी अंतर्गत व बाहय परीक्षकांकडून मूल्यमापन करण्यात येईल व इयत्ता १२ वीसाठी मूल्यमापन पद्धतीत बाह्य परीक्षकांची नियुक्ती बोर्डाकडून/मंडळाकडून करण्यात येईल असे नमूद करण्यात आलेले आहे.

**या विषयी दिनांक १२ मार्च, २०२१ रोजीच्या कार्यकारी (तदर्थ) परिषद सभेमध्ये विषय क्रमांक ७६ अन्वये ठराव पारित झाला आहे.**

**'पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार उच्च माध्यमिक स्तरावरील 'पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा' या विषयाच्या मूल्यमापन आराखडयात इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी 'पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा' या विषयासाठी अंतर्गत व बाह्य परीक्षकांकडून मूल्यमापन करण्यात येईल व इयत्ता १२ वी साठी मूल्यमापन पध्दतीत बाह्य परीक्षकांची नियुक्ती बोर्डाकडून/मंडळाकडून करण्यात येईल असे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि 'आरोग्य व शारीरिक शिक्षण' या व अन्य श्रेणी विषयांचे मूल्यमापन हे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर अंतर्गत परीक्षकांकडून करण्यात येते. सबब त्या धर्तीवर 'पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा' या श्रेणी विषयाचे मूल्यमापनही शालेय स्तरावर अंतर्गत परीक्षकांकडून करण्यात यावे. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना आवश्यकता भासल्यास त्यांच्या स्तरावर अंतर्गत व बाह्य परीक्षक त्यांच्याच उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून नेमण्याची मुभा असेल. परंतु श्रेणी विषयांच्या परीक्षकांसाठी कोणतेही मानधन अदा करण्यात येवू नये. असे ठरले.'**

तरी उपरोक्त ठरावाप्रमाणे आपल्या विभागातील सर्व संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास त्वरित सादर करावा.

**सचिव,**
**राज्यमंडळ, पुणे.**

---

क्र./नाविमं/उमा/अ—३/४५५
नाशिक — ४२२००३.
दि. —२५/०६/२०२१

प्रति,
प्राचार्य,
सर्व मंडळ मान्यता प्राप्त
उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
नाशिक/धुळे/जळगांव/नंदूरबार जिल्हे.

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य/मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, राज्य मंडळाचे वरील पत्राची नोंद घ्यावी. सदरचे पत्र सर्व शिक्षक व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक — ४२२००३.